# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०१/०१/२०२४

# प्रेसनोट

मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, महाराष्ट्र राज्य, यांनी दिनांक ३१/१२/२०२३ रोजी संपुर्ण महाराष्ट्रात सखोल स्वच्छता (Deep Clean) मोहिम राबविणेबाबत ऑनलाईन बैठकीत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा. आयुक्त यांनी आज दि. ०१/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता सर्व विभाग प्रमुख यांची मा. महा सभागृह हॉल येथे बैठक आयोजित करुन सर्व विभाग प्रमुख यांना सखोल स्वच्छता मोहिम (Deep Clean) संपूर्ण शहरात राबविणेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर बैठकीमध्ये सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

१) झाडांच्या बुंध्याना चुन्याचा पांढरा रंग आणि गेरु पट्टे मारणे.

२) रस्ता / पदपथ / दुभाजक लगतची अनावश्यक झाडे, झुडपे, गवत काढणे.

३) प्रसिध्द ठिकाणी बाजार पेठांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष.

४) पदपथ (रस्त्यावरील खांबांची / फलक / दिशा दर्शकांची दुरुस्ती आणि रंगरंगोटी करणे.

५) रस्त्यावरील खड्डे भरणे पट्टे मारणे.

६) शौचालये, सौंदर्य प्रसाधन गृह यांची स्वच्छता, रंगरंगोटी करणे.

७) रस्ते व पदपथावरील अतिक्रमण हटविणे.

८) पार्क केलेल्या वाहनांखालील कचरा साफ करणे.

९) बेवारस वाहने हटविणे.

१०) दाट लोक वस्ती / गल्या बोळांतील स्वच्छता करणे.

११) लोक सहभाग – स्थानिक लोकप्रतिनिधी, सेलिब्रेटी, NGO, NSS, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी.

१२) अस्वच्छता करणा-यांवर दंडात्मक कारवाई करणे.

१३) संपुर्ण स्वच्छता मोहिमे दरम्यान अतिरीक्त मनुष्यबळ, वाहने, यंत्र सामुग्री पुरविणे.

१४) प्रमुख रस्ते पाण्याची धुवण्याची कार्यवाही करणे.

१५) धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करणे, बांधकामांच्या ठिकाणी उपाययोजना करणे.

(छाया प्रकाश डोंगरे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.